ISSN - 2347-7075
Impact Factor - 7.328

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH




Journal Indexing

CiteFactor
Academic Scientific Journals

DRJI
IIJS

Publisher: P. R. Talekar.
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur (MS)

Young Researcher Association

**International Journal of Advance and Applied Research (IJAAR)**

**Peer Reviewed** **Bi-Monthly**

**Vol.9 No.2**
**November – December 2021**

## TABLE OF CONTENT


| Sr. No. | Name of Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Dr. Rajekhan Shikalgar<br>Mr. Sandeep Sutar | Spatial Distribution of Cardiovascular Diseases in Maharashtra State | 1 to 8 |
| 2 | डॉ. सर्जेराव शामराव पवार | कोरोना काळातील मानवी संसाधनाची दुरावस्था: अन्वयार्थ<br>(The Plight of Human Resource in the Corona Period: An implication) | 8 to 17 |

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.2 Nov – Dec 2021

# कोरोना काळातील मानवी संसाधनाची दुरावस्था: अन्वयार्थ
## (The Plight of Human Resource in the Corona Period: An implication)

**डॉ. सर्जेराव शामराव पवार**
सहयोगी प्राध्यापक
वाणिज्य विभाग प्रमुख,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

### प्रस्तावना :- (Introduction)

डिसेंबर २०१९ पासून आज अखेर संपूर्ण जग एका महाभयंकर व विनाशकारी अशा महामारीशीलढा देत आहे. जगाच्या इतिहासात गेल्या शतकभरामध्ये मानवी व वित्तहानी घडविणारी विषाणुजन्य आपत्ती आलेली नव्हती. प्लेगच्या आलेल्या दोन साथी, कॉलरा, एन्फ़्लुएन्झा, ब्लॅक डेथ, सार्स, मर्स, बर्ड फ्लू, स्वाईन फ्लू, अशा किती साथी आल्या मात्र जगामध्ये मृत्यू, भय, टाळेबंदी यांचा जेवढा कहर या साथरोगाने घडविला तेवढा या आधीच्या साथींनी घडविला नव्हता या पार्श्वभूमीवर भारतासारख्या जगातील दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या असणाऱ्या देशातील मानवी संसाधनाची या करोना महारीतील स्थिती व गती नेमकी कशी होती. हे पाहणे महत्त्वाचे आहे. कारण,आपण ज्या मानवाची चर्चा करतो तो सर्वत्र एकसारखा नसतो. तो कुठे गरीब तरकुठे श्रीमंत, कुठे प्रगत तर कुठे मागास. त्यामुळे अशा करोनासारख्या महामारी जेव्हा येतात तेव्हा श्रीमंत व प्रगत असलेला माणूसफक्त अडचणीत येतो मात्र गरीब व मागास माणसे नामशेषच होतात. त्याच अवघ जगणंच धोक्यात येते, आज जगामध्ये एकूण ७७० कोटी लोक राहतात. यातलं दुसऱ्या क्रमांकाच योगदान देणाऱ्या आपल्या भारतातच १३५ कोटी लोक राहतात. मात्र मानवी संसाधनाच्या विकासाच्या बाबतीत आपण जागतिक क्रमवारीत १२९ व्या स्थानावर आहोत. करोना काळात तर यामध्ये आणखी वाढ होणार आहे. भारतातील प्रचंड विषमता, बेरोजगारी, महागाई, शेती, उद्योग व सेवा क्षेत्रातील असंघटीत मजूर, स्थलांतरित,महिला, बालके यांची वाढती असुरक्षितता, दुरावस्था कमालीचीवाढली आहे. देश कोणताही असो त्याच्याकरता 'मानवी भांडवल' हे अनन्यसाधारण महत्वाचे असते. लोकसंख्या हाच प्रत्येक देशाच्या विकासाचा आधार स्तंभ असतो कारण त्याच जोरावर संपत्तीची निर्मिती, संवर्धन व संरक्षण करणे शक्य असते कोणत्याही देशाच्या सर्वांगीण विकासाचे मोजमाप हे केवळ राष्टीय उत्पन्न, जीडीपिचे आकडे, विकास दर अशा निकषांवरच होत नाही तर त्यासाठी मानवी

विकास निर्देशांक, दारिद्र्याचा निर्देशांक, समाधानाचा निर्देशांक अशा आयामांवर देखील तो ठरत असतो करोना आपत्तीमुळे जगभरातील देशाची 'न भूतो न भविष्यती' अशी जीविताची हानी झाली.

**परवलीचे शब्द :- ( Key Words )** महामारी :- (Pandemic), साथरोग :- (Epidemic), रोग :- (Diseases), शाश्वतता :- (Sustainability), कुपोषण :- (Malnutrition), उपासमार :- (Hunger Malnutrition).

## आभ्यास विषयाचे महत्व :- (Importance of the study )

करोना महामारी व कोविड-१९ हा विषाणू यापूर्वीच्या साथरोगांपेक्षा खूपच वेगळ्या तीव्र संसर्ग क्षमता असलेला व प्रचंड जीवित हानी घडविणारा आहे. तब्बल एक वर्ष त्यावरती लस व औषध उपलब्ध नव्हते.परिणामी त्यांच्या संसर्गाने झालेले मृत्यू रोखण्यासाठी जी टाळेबंदी झाली त्यातून निर्माण झालेले प्रश्न, त्यावरील उपाय यांचा शास्त्रशुद्ध तर्काधीष्टीत अभ्यास होणे खूपच म्हत्वाचे आहे.

## उद्दिष्टयै :- ( Objectives )

सदर विषयावरील संशोधन करीत असताना पुढील उद्दिष्टयै समोर ठेवण्यात आलेली आहेत

१. करोनाचा मानवी संसाधनांवर झालेला परिणाम अभ्यासाने

२. करोना साथीमुळे मानवी संसाधनांची झालेले दुरावस्था समजावून घेणे

३. करोनातून झालेल्या मानवी भांडवलाच्या हानीची वस्तुस्थीती स्पष्ट करणे

## गृहितक :- ( Hypothesis)

कोरोना महामारीमुळे मानवी भांडवलावर प्रतिकूलपरिणाम झाला

## संशोधन पद्धती :- (Research Methodology )

सदर विषयावरील संशोधन करीत असताना भारतीय व जागतिक अर्थकारणाशी संबधित २०१९ - २०२० वर्षातीत आकडेवारी, माहिती, घटना याचा आधार घेतलेला आहे. याशिवाय सशोधिकांनी घेतलेल्या नोंदी, केलेली निरीक्षणे यातून काही विश्लेषणे व निष्कर्ष दिले आहेत.

**प्राथमिक स्त्रोत :-**

१. स्वतः घेतलेल्या नोंदी.

२. विविध घटना, प्रसंगांचे विवेचन व अन्वयार्थ

३. विविध बाबींची निरीक्षणे.

**दुय्यम स्त्रोत :-**

१. विषयाशी संबंधित संदर्भ पुस्तके

२. शासकीय, सामाजिक व संशोधन संस्थाचे अहवाल

३. सर्व्हे रिपोर्ट.

४. नियतकालीके, मासिके, दैनिके, सहामाही व वार्षिक व साप्ताहिक अंक

५. विविध संकेत स्थळांवरील उपलब्ध माहिती

**पूर्व संशोधनाचा आढावा :- ( Re-view of Literature )**

सदर विषयावर याआधी ‘क्राय’ या मानव संसाधनाशी संबंधीत काम करणाऱ्या संस्थेने काम केले आहे तसेच लॅन्सेट या प्रसिद्ध पक्षीकामधेही काही संशोधन अहवाल प्रसिद्ध झालेले होते. त्याआधारे कोरोना काळातील मानवी संसाधनाच्या विकासातील व त्याच्या अस्तित्वावरील असणारे अडथळे स्पष्ठ झाले. या सोबतच ‘युनेस्को’जागतिक बँक यांचे अलीकडचे अहवाल देखील उपयुक्त अशी माहिती देणारेठरले. यासोबतच विविध दैनिकांमध्ये वेळोवेळी प्रकाशित झालेले लेख, संपादकीय लेख यांतूनही प्राप्त झालेली माहिती उपयुक्त ठरली.

**कोरोना काळातील मानवी भांडवलाची दुरावस्था :- ( The Plight of Human Resources in the Corona Period)**

कोरोनाचे जसे अर्थकारणावर परिणाम झाले. त्याने जशी जगाची भू-राजकीय रचना बदलून टाकली, त्याच्या प्रभावातून जसे अगणित सामाजिक व मनोवैज्ञानिक प्रश्न उभे राहिले तसे त्याने एकूणच मानवी भांडवलाची जी दुरवस्था केली त्याचे विविध पैलू पुढीलप्रमाणे पाहता येतील

**मानवी संसाधनांच्या आरोग्याचा भयावह प्रश्न:-**

वरवरच्या सोयी सुविधांचा मुलामा असलेली आपली आरोग्य यंत्रणा हा देशातील मानवी संसाधनाची केलेली सर्वात मोठी प्रतारणा आहे. सामाजिक आरोग्य संवर्धनाची गरज वा आवश्यकता काय आहे याबाबत अमेरिकन पब्लिक हेल्थ असोशिएशनने आपल्या अभ्यासाद्वारे एक अर्थपूर्ण निष्कर्ष काढला होता. त्यानुसार, “आपण आरोग्य सुदृढीकरणावर १ डॉलर एवढी गुंतवणूक करतो तेव्हा त्यातून भावी काळात आरोग्य उपचारावर कराव्या लागणाऱ्या पाच डॉलर एवढ्या खर्चाची बचत होते.” वास्तवात सध्याच्या आधुनिक आरोग्य सेवा या तात्पुरत्या उपाययोजना असून त्याद्वारे आरोग्याची शाश्वत हमी देता येत नाही. कमीत कमी आरोग्य सेवांची गरज भासणं हेच सुदृढ मानवी संसाधनांचे निर्देशक असतेकारण इटली, स्पेन या देशांच्या आरोग्य सेवा या कितीतरी उत्कृष्ट होत्या. तरीही त्यांना कोरोनाचा भार पेलता आला नाही. यातूनच शाश्वत आरोग्याची गरज अधोरेधीत होते. कार्यक्षम सर्वाजानीक आरोग्य यंत्रणा, सार्वजनिक लसीकरण, लोकसंख्या नियंत्रण, स्वच्छता, प्रदूषण नियंत्रण, संशोधन, मानवी स्वास्थ्य, पोषणयुक्त आहार, शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य विकास, वैज्ञानिकता अशा पायाभूत संरचनांवरच शाश्वत विकासाची इमारत उभी असते याशिवाय व्यक्ति निहाय दैनंदिन सवयी, आहार, विहार, व्यसनासक्तीचेप्रमाण या गोष्टींची परिणामकारकता देखील यामध्ये महत्वपूर्ण ठरते.

या सर्व पार्श्वभूमीवर येत्या काळात आपल्याला आरोग्य सेवांवर एकूण जीडीपीच्या ३ ते ५ टक्के एवढा खर्च करावा लागणार आहे. त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीच्या शक्यताही निर्माण होतील. कारण आज देशामध्ये पुरेसे दवाखाने, त्यातील बेड्स, आयसीयू, व्हेंटिलेटर्स, डॉक्टर, नर्स,मेडिकल स्टाफ, वार्ड बॉय, सफाई कर्मचारी यांची किती कमतरता आहे हे कोरोना काळात समोर आले आहे आता या सेवांची परीपुर्ती करताना लाखो हातांना रोजगार मिळणार आहे. येऊ घातलेली आर्थिक मंदी, जागतिकीकरणाला बसू लागलेली खीळ हे सर्व पाहत सरकारी खर्च तसही वाढणारच आहे. यातून येत्या काळात खाजगी वैद्यकीय शिक्षणाचा वेग मंदावेल कारण ते नफ्या –तोट्याच्या गणितावर चालतं. त्यामुळे येत्या काळात सरकारनेच वैद्यकीय शिक्षणामध्ये प्रभावी गुंतवणूक करावी ज्यायोगे डॉक्टर्स व इतर वैद्यकीय सेवांचा तुटवडा कमी होईल शिवाय आता आपल्याला आरोग्य सेवांची नवी यंत्रणा उभी करावी लागेल ज्यामध्ये दायींनाप्रशिक्षित करून त्यांना विविध रुग्णालयाशी जोडून शास्त्रीय प्रसुतींच प्रमाण वाढवावं लागेल. टेली मेडीसीन, टेली कन्सल्टिंग सारख्या तंत्रस्नेही उपचार पद्धती विकसित कराव्या लागतील.

**कोरोना काळातील महिलांची दुरावस्था:-**

अलीकडील काळात भारतीय स्त्रियांवर वाढलेले अत्याचार हा विषय एवढा संवेदनशील झाला आहे की युपिएससीच्या मुख्य परीक्षेतील पहिल्या पेपरमधील सामान्य अध्ययन या घटकात याचा अंतर्भाव करावा लागला. आज कृषी व ग्रामीण क्षेत्रात महिलांचे शारीरिक व मानसिक शोषण सुरु आहे सुशिक्षित व शहरी भागात मुलींचं प्रमाण घटत चाललयं नोकरी व व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना होणारा लैंगिक त्रास ही जणू आपल्या व्यवस्थेची लक्षणं बनू लागली आहेत या बाबतीत अनेक कठोर कायद्यांची तरतूद असूनही स्त्रियांचे प्रश्न दिवासेंदिवस गंभीर होत आहेत. स्त्रियांना राजकारणात ५०% व नोकरीत ३३% आरक्षण असूनही त्यांची दुरावस्था आहे डॉ. अमर्त्य सेन यांनी फ्रंटलाईन या पाक्षिकामध्ये २००९ साली प्रसिद्ध केलेल्या लेखामध्ये 'मिसींग वुमेन' या संकल्पनेद्वारे स्त्री सुद्धा एक मुलभूत मानवी गरज असल्याचे मत मांडले आहे

भारतातील स्त्रियांची ही दुरावस्था कोरोना काळात तर खूपच प्रकर्षाने पुढे आली.टाळे बंदीत स्त्रियांना घरात प्रचंड राबवलं जान, त्यांच्यावरील मानसिक व शारीरिक हिंसाचारात वाढ होण असे प्रकार मोठ्या प्रमाणात घडले. स्थलांतरीत महिलांची रस्त्याच्या कडेला, रेल्वे डब्यात, बाळंतपण झाली. हातावर पोट असणाऱ्या महिलांचे रोजगार गेले. यांच्यावर उपासमारीची वेळ आली. देह विक्रय करणाऱ्या स्त्रिया, तमाशा, ऑर्केस्ट्रा व्यावसाईक स्त्रिया यांचे खूप हाल झाले अनेक परप्रांतीय महिला आपलं सामान, मुलं-बाळ घेऊन शेकडो किलोमीटर चालत राहिल्या. बस स्थानकावरच अन्ना आभावी मृत पावलेली महिला व तिला उठवणार तिचं छोट मुल असं केवीलवाण दृश्यही आपण पाहिल. धुनी-भांडी,स्वयंपाक, मुलांचा सांभाळ करण, मोलमजुरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न कोरोना काळात खूप गंभीर होते.

**अन्न टंचाई व भुकेचा प्रश्न:-**

कोरोना काळात जगभरात जरी पुरेसा अन्नसाठा उपलब्ध असला तरी कोरोना काळात गरीब व गरजू लोकांपर्यंत त्याचा पुरेसा पुरवठा होऊ शकला नाही. या काळात अन्नधान्याच्या बाबतीतील आंतरराष्ट्रीय सहकार्य, त्यांची खुली बाजारपेठ, पुरवठा यंत्रणा पूर्णपणे विस्कळीत झाली. कोलमडून गेली. या सर्वांच पुनर्वसन येत्या काळात जागतिक अन्न संकटात होण्याची शक्यता संयुक्त राष्ट्र संघटनेच्या 'अन्न व शेती' संघटनेने वर्तविली आहे. कारण कोरोना काळात अन्नाच्या जागतिक मागणी - पुरवठ्यात कमालीची घट झाली. यातून शेती व शेतकरी वर्गाला मोठा तोटा सहन करावा लागला. कोरोनापूर्व काळातच १३५ द. ल. लोक अन्नटंचाईचा

सामना करीतच होते. कोरोना व कोरोनोत्तर काळात यामध्ये १८३ द. ल. लोकांची भर पडणार नाही. 'ग्लोबल नेटवर्क अगेंस्ट फूड क्रायसीसच्या' अहवालानुसार या अन्न संकटाचा सर्वाधिक फटका सर्वात जास्त आफ्रिकन देशांना बसणार आहे. यामध्ये ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणावर असणार आहे. या सर्वातून जर आपल्याला सुटका करून घ्यायची असेल तर येत्या काळात आपणाला शेती क्षेत्रासाठीची आदाने, सोयी यांवर लक्ष दयावे लागणार आहे. या शेतमाल विक्रीची यंत्रणा अद्ययावत करायला हवी. शेतकरी वर्गाला हातभार दिला पाहिजे. छोट्या व अल्पभूधारक शेतकऱ्यांना लागणारे भांडवल व आर्थिक मदत दिली पाहिजे. शेतमालाचा आंतरराष्ट्रीय व्यापार बंधनमुक्त करायला हवा.

**बालकांचे संकटातील अस्तित्व व भविष्य:-**

कोरोनाने गरीब, अल्प विकसित, विकसित अशा सर्वच देशातील कोट्यावधी कुटुंबांचे रोजगार, व्यवसाय, उद्योग बुडाल्यामुळे त्यांच्या स्थलांतरामुळे अनेकांचे मृत्यू झाल्याने कौटुंबिक उत्पनाची पातळी ही कमालीची घटली. त्यामुळे कौटुंबिक भरणपोषणाकरता, झालेले नुकसान भरून काढण्याकरता येत्या काळात मोठ्या लोकांसह छोट्या मुलांनाही मिळेल ती कामे करावी लागतील. यातून बालमजुरीचे प्रमाण वाढलेले आहे. कोरोनोत्तर काळात आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबाचे प्रमाण तब्बल२०% नी वाढलेले आहे. खेड्यातील शेती व शेती सलग्न व्यवसाय, शेती पूरक उद्योग, शहरामधील घरे, कार्यालये, हॉटेल्स, चहा स्टॉल, रेस्टॉरंट, पेपर विक्री, भंगार व रद्दी व्यवसाय अशा ठिकाणी बालमजुरी वाढू लागली आहे. असे निष्कर्ष युनिसेफच्या ताज्या अहवालात दिलेले आहेत.

आपल्या भारतामधील बालमजुरीबाबत काम करणाऱ्या 'क्राय' या संस्थेने महारष्ट्रातील मुंबईपुणे, सोलापूर, नाशिक, परभणी, अशा पाच शहरांनचा अलीकडेच एक सर्व्हे केला होता. त्यामध्ये त्यांना कोरोना पूर्व काळातच ३५% बालके बालमजूर असल्याचे आढळून आले. एवढेच नव्हे तर ऐन टाळेबंदीतही कुटुंबाची आर्थिक विवेचना दूर करण्याकरता सरासरी १५ ते २० दिवस या मुलांना मजुरीची कामे करावी लागलीत. परिणामी कोरोनोत्तर काळात बालमजुरीचे हेच प्रमाण वाढून ते३०% वर जाण्याची शक्यता आहे. याच काळात जे ऑनलाईन शिक्षण सुरु झाले त्यातून तब्बल३०% मुले तांत्रिक कारणास्तव वंचित राहिली. विशेषतः ग्रामीण भागातील हे प्रमाण ६४% पेक्षा जास्त आहे. केंद्र व राज्याद्वारे ऑनलाईन शिक्षणाकरता दूरदर्शन, रेडीओ,

मोबाईल ॲप्स द्वारे ज्या सोयी केल्या गेल्या त्या फक्त २८% मुलांपर्यंत पोहचल्या आहेत जगभरामध्ये तर तब्बल १५४ कोटी बालके सध्याच्या कोरोना काळात शिक्षण वंचित आहेत.

या सर्वांचा मुलांच्या शैक्षणिक भवितव्यावर खूपच नकारात्मक परिणाम झालेला दिसून आलायाबाबत पीटीआयने युनेस्कोच्या शिक्षण विभागाच्या सहाय्यक महासंचालिका स्टेफानीया गीयानीनी यांची मुलाखत घेतली होती. त्यामध्ये त्यांनी दिलेली माहिती आपली चिंता वाढवणारी आहे जगामध्ये आज १५४ कोटी बालके शिक्षणात गुंतलेली आहेत. यामध्ये मुलांचे प्रमाण ७४% एवढ आहे. यामध्ये ११% मुली या गरीब देशातून येतात.जिथं त्याचं शिक्षण खूप जिकिरीच आहे ज्या काही देशांमध्ये निर्वासीतांच्या छावण्या आहेत तेथील मुला मुलींचे शिक्षण सुरु होणं अवघड आहे यांमध्ये जर किशोरवयीन मुलींचं शिक्षण थांबल तर त्यांच्यावरील लैंगिक अत्याचार वाढतील, त्यांचे बालविवाह लावले जातील, त्यातून अकाली गर्भधारणेच प्रमाण वाढेल. या सर्वातून शिक्षण क्षेत्र पुन्हा एकदा लिंगविषमतेकडे जाण्याची भीती आहे

**दारिद्र्यात होणारी भयावह वाढ :-**

गरीबी आणि दारिद्र्य यांच जगभरातील प्रमाण कोरोनापूर्व काळातही जास्त होतचं मात्र कोरोनाणं त्यात जास्त भर पडली आहे. कारण टाळेबंदीत थंडावलेले उद्योग, मंदावलेलं अर्थचक्र त्यामुळे यातून श्रीमंतही सुटले नाहीत. कारण कोरोना प्रभावामुळे जगभरातील श्रीमंतांच्या संपत्तीत कमालीची घट झाली आहे त्यामुळे अनेक श्रीमंतांची नावे अब्जाधीशांच्या यादीतून जाताना दिसत आहेतया बाबतीतला अभ्यास 'हुरूनग्लोबल' नावाच्या एका संशोधन संस्थेने केला आहे त्याच्या सर्वेक्षणानुसार जगातील ८६% अब्जाधिशांची वर्णी आता गरीबांमध्ये लागली आहे. यातुन फक्त पाच टक्के धानिकांच्याच तिजोऱ्या जैसेथे राहिल्या आहेत श्रीमंतांच्या गरिबीचं वृत्तांकन एवढ्याकरताच कारण मुळातील गरिबांचीजागा जर पूर्वाश्रमीचे श्रीमंत घेणार असतील तर पुर्वाश्रमिंच्या गरिबांच काय? त्यांच्या तर जगण्यावरच भल मोठं प्रश्नचिन्ह लागलेलं आहे

जागाचं दारिद्र्य, दुःख, दैन्य कमी करून सामाजिक कल्याणाची पुण्यकर्म करण्यासाठी जन्माला आलेल्या व त्यामुळेच वर्धिष्णु झालेल्या 'जागतिक व्यापार संघटना' आणि 'जागतिक आरोग्य संघटना' यांचा फोलपणाही कोरोनाणं जगासमोर आणला. आज या संस्थांमध्ये जगातील २५% विकसित देशांचे विशेषाधिकार चालतात. जे उरलेल्या ७५% गरीब देशांना लाचारपणे स्वीकारावे लागतात. जागाचं कल्याण करू पाहणाऱ्या याच संस्था आजवर जगामध्ये विषमता कशी वाढेल यांचीच तरतूद करत आल्या आहेत आज संपूर्ण जगात ८

अब्ज लोक राहतात. हे लोक जगातील एकूण २२५ देशांमध्ये विभागलेले आहेत. या २२५ देशांपैकी फक्त पाचच विकसित देश असे आहेत की, ज्यांच्याकडे या आंतरराष्ट्रीय संघटनांचे विशेषाधिकार आहेत व एकूणजगाच्या लोकसंख्येतील ८ अब्ज लोकांपैकी फक्त २ अब्ज लोक या पाच देशांत राहतात. आता कोरोनामुळे जगातील उरलेले ६ कोटी लोक भयावह संकटात सापडणार आहेत. परिणामी २०३० पर्यंत जगाला दारिद्र्यामुक्त करण्याचा युनोचा संकल्प पूर्णत्वाला जायला आता आणखी वाट पहावी लागणार आहे कोरोनापूर्वी जगातील ११% लोकसंख्या आधीच दारिद्र्य रेषेखाली जगत होते या ११% मध्ये आफ्रीकी देशांतील चाळीस कोटी लोक येतात, मध्यपूर्वेतील २ कोटी, दक्षिण आशियातील २१ कोटी लोकांचाही यामध्येही समावेश होतो ज्यात सर्वाधिक संख्या पाकिस्तान व अफगाणिस्तानातील लोकांचीआहे.

**आव्हान वाढत्या आर्थिक विषमतेच :-**

आज ज्या भांडवलशाही विचार धारेचा पगडा संपूर्ण जगावर आहे तिला विषमतेचं फारसं वावग नाही इतकच काय तर ही मंडळी सरळ सरळ म्हणतात की, “विकास जर हवा असेल तर थोडीतरी विषमता स्वीकारावी लागेलच.” याचाच अर्थ भांडवलशाही अर्थकारणाला विषमता पोषक असते. एका अर्थाने ती विषमतेच्या रसायनावर पोसलेली असते. या भांडवलशाहीनं जोपर्यंत सरकारच्या सार्वजनिक उत्पन्न व खर्चाशी मिळतं जुळतं घेत आपलं काम सुरु ठेवलेलं होत तोपर्यंत विषमता वाढलेली नव्हती १९४५ ते १९७५ या काळाला ‘भांडवलशाहीच्या विकासाचा सुवर्णकाळ’ असं म्हटलं जात असे असुनही याच काळात खाजगी संपत्तीवर ७०% एवढ्या दरानं कर आकारणी केली जायची. तरीही भांडवलशाही विना तक्रार वाढत होती. कारण त्यातून विषमता वाढत नव्हती. मात्र नंतर जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या आलेल्या लाटेने हेच करांचे दर अगदी ३०% पर्यंत खाली आले. त्यातून सरकारी उत्पन्न व खर्च दोन्ही घटत गेली व सरकारवरील कर्जे मात्र वाढत गेली. त्यातून महागाई फुगत गेली. दुसरीकडं नव श्रीमंत वर्ग उदयाला येत गेला.हा संख्येनी अल्प व संपत्तीने मोठा होत गेला. मात्र सार्वजनिक खर्च घटत गेल्यान बहुसंख्यांचे उत्पन्न व रोजगार घटत गेले. त्यातून दारिद्र्य व बेकारी वाढली. आरोग्य, शिक्षण, दळणवळण यांपासून ते दुरावत गेले.असं हे गरिबी व विषमतेच दुभंगलेल जग कोरोन येईपर्यंत आकाराला येत गेल.

आज आरोग्यावर एकूण जीडीपीच्या ६% खर्च होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात तो १.५% ते २.५% एवढाच होत आहे. त्यातून सार्वजनिक आरोग्य यंत्रणा आकसत चालली आहे रुग्णांना पुरेसे बेड्स उपलब्ध

नसल्याणं त्यांनी जमिनीवर झोपण, आयसीयू, व्हेन्टिलेटर्स, एमआयआर अशी उपकरणं नसणं अशा कमतरता उभ्या राहिल्या. भारतात आज फक्त १% लोकांकड एकूण संपत्तीच्या५८ % संपत्ती आहे. भारतातली ही विषमता अमेरिकेपेक्षा मोठी आहे. या १% नंतरचे जे १०% लोक आहेत त्यांच्याकडे उरलेल्या संपत्तीपैकी८०% संपत्ती आहे. याउलट गरिबीच्या अगदी तळात जे १०% लोक राहतात त्यांच्याकडे एकूण संपत्तीच्या ०.७% संपत्ती आहे. याच्या वर जे १०% गरीब आहेत त्यांच्याकडे ०.२% संपत्ती आहे. व त्यावरचे जे १०% लोक आहेत त्यांच्याकडे ०.५% संपत्ती आहे. थोडक्यात या तळातील ३०% लोकांकडील एकत्रित संपत्ती मिळून देखील०% च्याही खालीच आहे. आज भारतातील ९०% लोकांच्या हातात एकूण संपत्तीतील फक्त१७.३% एवढाच भाग आहे. यातलं विषमतेच विदारक चित्र हे आहे की, देशांतील १% लोकांकडं९०% लोकांकडं असलेल्या संपत्तीच्या तिप्पट संपत्ती आहे असं हे विषमतेनं भरलेलं समाज रचनेच वास्तव कोरोना व येत्या कोरोनोत्तर काळात वाढत जाणार आहे.

### मानवी संसाधनाच्या शाश्वततेसाठी शिफारशी :- (Suggestions for Sustainability of Human Resource)

१. आरोग्यावरील खर्च जी.डी.पी.च्या ६% पर्यंत वाढवावा.

२. ग्रामीण व शेती क्षेत्रात पायाभूत सोयी, सुविधा, उपक्रमांत गुंतवणूक वाढवावी.

३. शेतमाल विक्री व्यवस्था प्रभावी बनवावी.

४. सूक्ष्म-लघु व मध्यम उद्योगांना चालना द्यावी

### संशोधनावरील मर्यादा :- (Limitations to Research )

सदर अभ्यास विषयावरील संशोधन करीत असताना अद्ययावत आकडेवारी, सरकारी माहिती, यावर आधारित संदर्भ पुस्तके याची मोठी मर्यादा असलेली दिसून आली मुख्यत. मराठीमध्ये याविषयीची माहिती फारच थोडया प्रमाणात उपलब्ध आहे.

### समारोप :- (Conclusion)

जगामध्ये आजवर अनेक महामारी आल्या त्यांनी प्रचंड प्रमाणात जीवित व वित्त हानी घडवून आली. मात्र २०१९-२० मधील कोरोना महामारी, तीन घडविलेल जिवीताच अर्थकारणाच नुकसान हे खूपच मोठं आहे

त्याचे सामाजिक, राजकीय परिणाम हे खूप दुरागामी असणार आहेत.या सर्वांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम हा मानवी संसाधनावर झालेलाच आहे. व इथून पुढंही त्यांची व्याप्ती वाढत राहील.मात्र याच गांभीर्य लक्षात घेत वेळीच या मानवी संसाधनाच्या शाश्वती करणासाठी शासनाच्या व समाज्याच्या पातळीवर प्रयत्न केला तर येणाऱ्या भविष्यातील हानी टाळता येईल.

**संदर्भ :- (References )**


1. With excellent druge India fighting with covid-19 - Tabsumnnepmue, - The Indian Express - 9th June 2020.
2. How will corona virus change the words Economy - Varna netimgreri - Catobal Times - 5 May 2020.
3. Lenset study croud effect on covid-19 Heard emunity - PTI,7 July 2020.
4. Priskripsane for action nine stapes after the next 21 dayes -Ester tafelow, abhijlitbenarji - The India will gain if business shift from china due to covid-19 - The Economic Times - 12 May 2020 .
5. The eyes of darkness - dean crugman Pocket Books, Feb 1981.
6. कोरोना बंध :- प्रा. डॉ. जे.एफ. पाटील - समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी, कोल्हापूर १ जून २०२०.
7. डॉ. कौशिक बसु - अॅन अनएक्सपेक्टेड टर्निंग पॉईंट द इंडियन एक्सप्रेस गुरुवार २३ मार्च २०२०.